Review Of Research
Vol.1,Issue.VII/April; 12pp.1-4 डॉ.राऊत ए.आर. ISSN:-2249-894X

Research Papers

# ''शिक्षकाची उत्कृष्ट कार्यासाठी वचनबध्दता/बांधिलकी''

डॉ.राऊत ए.आर.
श्री शा.भ.ए.सो.अध्यापक महाविद्यालय,
नांदेड.

## प्रस्तावना :—

समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या अनेक प्रक्रियापैकी समाजाचे सामाजीकरण होणे ही एक अखंड प्रक्रिया आहे, चालू असलेली एखाद्या समाजाचे सांस्कृतिकरण होत असताना समाजाच्या प्रत्येक किये—प्रकियेमध्ये त्या विशेष घटकाचे केंद्रिकरण होत असते, तर कार्याच्या प्रत्येक घटकाचे विशेषीकरण होत असते. आणि या सर्व गोष्टी आपल्या समाजाच्या वैशिष्टयानुसार भर टाकण्याचे कार्य करीत असतात.

समाजामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये विशेषीकरणाची प्रक्रिया अंतर्भूत होत असताना आपणास पाहावयास मिळते आणि या प्रक्रियेला शिक्षकांचा पेशा हा सुध्दा अपवाद नसल्याचा दिसून येते. शिक्षकाच्या शिक्षकी व्यवसायामध्ये होत असलेले हे विशेषीकरण शाळा प्रशासनामध्ये केंद्रिकरणाची प्रक्रिया मागत आहे. आणि ती विधात्याच्या माध्यमातून, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होय.

शिक्षक हा प्रत्येक देशातील, प्रत्येक समाजातील प्रत्येक घटकाचा कणा समजाण्यात येतो. समाजाचा प्राणवायू जर शिक्षकाला संबोधले तर या मध्ये विकास करावयाचा असेल तर शिक्षक हा घटक अत्यंत महत्वाचा आहे.

### स्वातंत्रोत्तर भारतामधील शिक्षक शिक्षण :

स्वातंत्र मिळाल्यानंतर भारतीय शिक्षणप्रणाली मध्ये विस्तार होत गेला. परिणाम, शिक्षणाच्या अनेक क्षेत्रामध्ये प्रशिक्षित शिक्षकांच्या मागणी मध्ये वाढ होऊ लागली. त्यामुळे आपल्या देशाच्या शिक्षण पध्दतीमध्ये पुनर्रचनेमध्ये शिक्षक—प्रशिक्षणाला महत्वाचे स्थान देण्यात आले. त्यातील उणीव आणि गुणात्मक वृध्दीसाठी, उपाययोजना करण्यासाठी शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. यामध्ये शिक्षणाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकण्यात आला.

### शिक्षक शिक्षणाची संकल्पना :

स्वातंत्र्यपूर्वी शिक्षक—प्रशिक्षणाची प्रचंड संख्यात्मक वाढ आणि गुणात्मक वृध्दी इ. झाली आहे. केवळ प्रशिक्षण क्षेत्रामध्ये समाविष्ठ होणा—या नवनवीन विचारांना अनुकूल बनविण्याचा विशेष प्रयत्न झाला नाही. त्याचा परिणाम स्वातंत्र्यपूर्वी शिक्षक — प्रशिक्षणाचे स्वरूप मर्यादित राहिले. शेवटी स्वातंत्र्यानंतर देशामध्ये शिक्षण तंज्ञानी राजनितीतज्ञांनी, शिक्षक—प्रशिक्षणाला नवीन रूपे दिली आणि शिक्षक प्रशिक्षणाला व्यापक स्वरूपात बनविले आणि त्यास शिक्षक शिक्षण हे नामविधान लावले.

समाज, अध्ययनार्थी यासाठी शिक्षक हा ज्ञानाचा स्त्रोत असतो. शिक्षकाने आपली ही प्रतिमा कायम ठेवून आपला व्यवसाय उत्कृष्टपणे करण्यासाठी सातत्याने अध्ययनार्थी असावे. यासाठी शिक्षकाने अध्यापनव्यवस्थेसाठी आवश्यक असणारी मूल्ये, क्षमता, गुणवैशिष्टये आणि कौशल्ये प्राप्त करून आपली 'ज्ञानाचा स्त्रोत' ही प्रतिमा कायम टिकवावी. ज्ञानाचे संक्रमण हे केवळ शब्दांनी होत नाही तर त्यासाठी कृती, वर्तन व चारित्र्य यांचीही आवश्यकता असते. शिक्षकांनी आपली उक्ती आणिक कृती यात साम्य देवून कार्य करावे. व्यावसायिक उत्कृष्ठता प्राप्त करण्यासाठी शिक्षकाने एक वचन नेहमी लक्षात ठेवावे.

There is better way to do than what I have done tody हे वचन एक मार्गदर्शन तत्व म्हणून अंमलात आणल्यास व्यवसायाची उत्कृष्ठ पातळी गाठता येईल.

एन.सी.टी.ई ने व्यावसायिक उत्कृश्ठतेसाठी शिक्षकामध्ये पुढील प्रकारच्या निष्ठ्ज्ञ असाव्यात असे नमूद केले आहे.

1. आपल्या व्यवसायाला उत्कृष्ठता प्रदान करण्यासाठी आणि शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी उच्च ज्ञान मिळविणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोणातून विकसित करणे.
2. आदर्श अध्यापक होण्यासाठी केवळ शब्दांची नव्हे तर कृती, वर्तन आणि चारित्र्याची आवश्यकता असते. उदा : उत्तम चारित्र्य व वर्तन आणि उत्कृष्ठता गाठता येते.
3. ज्ञानी समाजाचा मार्गदर्शक, तत्वज्ञ व मित्र म्हणून कार्य करण्यासाठी उत्तम 'माणूस' होण्यासाठी प्रयत्न करावा.


### अध्यापकाची सचोटी/प्रामाणिकपणा व्यावसायिक सचोटी :

समाज आणि अध्ययनार्थ्यांना अध्यापन व्यवसायाचे महत्व पटवून देणारा आणि समाजामध्ये एक प्रामाणिक व्यवसाय म्हणून ओळख करून देणारा शिक्षक प्रमाणिक असतो, सचोटीने आपला व्यवसाय करतो. अध्यापकाला वर्ग, शालेय स्तर/संस्थांतर्गत शालाबाह्य कार्यक्रम पालकांबद्दल, समाजाबाबत सचोटी या सर्वांसोबत प्रमाणिकपणे कार्य करावे लागते. यावरून अध्यापकाची

व्यवसायीक सचोटी सिध्द होते.

1. वर्गाध्यापन
2. शालाबाह्य कार्यक्रम
3. पलकांशी प्रामाणिकपणा
4. समाजाप्रती प्रमाणिकपणा

अध्यापकाच्या व्यावसायिक विकासासाठी खालील तीन बाबी आवश्यक आहेत.




मूल्यनिष्ठा : (Commitment to Basic Values)

संपूर्ण जगभर मूल्यसंवर्धन मूल्यविकास आणि मूल्यशिक्षण हे मुद्दे सतत चर्चेत राहणारे मुद्दे आहेत. शैक्षणिक धोरणांनी मूल्यशिक्षण, मूल्यरूजवण करणे हे शिक्षणाचे ध्येय असल्याने नमूद केले आहे. त्यानुसार विविध शाळा / महाविद्यालयातून मूल्यशिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षणासाठी आजपर्यंत अनेक पध्दती उदयाला आल्या. शिक्षकाने स्वतः मूल्यधिष्ठीत आचारण करून विद्यार्थ्यांमध्ये शब्दाद्वारे नव्हे तर वर्तन व कृतीद्वारे मूल्यांची रूजवणूक करावी.

***शिक्षक – शिक्षणाचा दर्जा :***

शिक्षण पध्दतीचे यश बहुतांशी शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते आणि शिक्षकांची गुणवत्ता प्रशिक्षणाच्या दर्जावर असते. सर्वसामान्यतः असे मानले जाते की, शिक्षक – शिक्षणाचा दर्जा काही अपवाद वगळल्यास साधारण कमी प्रतीचा आहे. प्रचलित शिक्षण पध्दती लवचिकही नाही. ही उणिव विविध समित्या व आयोग ह्यांनी वेळोवेळी दाखवून दिली आहे.

शिक्षक–शिक्षणाचा दर्जा खालविण्याचे विविध कारणे दिली जातात. बुध्दिमत्ता विद्यार्थी व शिक्षक शिक्षकी पेशाकडे आकर्शिले जात नाहीत. कारण शिक्षकी पेशाकडे आकर्शीले जात नाहीत. कारण शिक्षकी पेशा लाभदायी नसतो. दुसरे असे की, शिक्षकांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उच्च प्रतीचा नसतो. शिवाय पुष्कळ शिक्षक–शिक्षण संस्थात गटबाजी, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, पक्षपातीपणा असतो. अशा संस्थेतील शिक्षक–शिक्षणाच्या दर्जाबद्दल व बोलणेच योग्य होईल.

काही अंशी दर्जा खालवण्याची जबाबदारी विन–अनुदानित खाजगी शिक्षक शिक्षण संस्थावर आहे. पूर्ण पात्र असणारे प्राध्यापक, व्याख्याते नसणे, सरावपाठ देण्यासाठी समाधानकारक सुविधा नसणे, आवश्यक ती अध्यापन साधने नसणे वगैरे, काही शिक्षक शिक्षण संस्थांची वित्तव्यवस्था समाधानकारक नसते. जागेच्या आभावी संस्कृतिक कार्यक्रम नियोजित करता येत नाही. अंतर्गत मूल्यांकन निपक्षपातीपणे होत नाही. आपलीच संस्था पुढे दामटण्यासाठी आवजवी अंतर्गत मूल्यांकन केलेले असते.

***संदर्भसूची :***

1. शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीमध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची भूमिका एक चिकित्सक अभ्यास – डॉ.साखरे एस.एस. (पीएच.डी संशोधन प्रबंध)
2. शिक्षक–शिक्षण – प्रा.बन्सी बिहारी पंडीत, प्रा.डॉ.सौ नलिनी पाटील., प्रा.डॉ.सौ.लता सुभाश मोरे.
3. Dictionary and Handbook and Teacher Education – R.S.Reddy.
4. Encyclopedia and Education – B.N.Das., Pal Monrao (Editoary)